मूल्य : ५ रुपये

स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

Volume : 1, Issue : 4. वर्ष : १, अंक : ४

जुलै २०२६



## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था

- ❖ संस्थाध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'सहकार गौरव' पुरस्कार
- ❖ राज्य पतसंस्था फेडरेशनचेही करणार नेतृत्व
- ❖ ठेववृद्धी मास उपक्रमाला यंदाही भरभरून प्रतिसाद
- ❖ ग्राहकांनी ठेवल्या ३४.१९ कोटी रुपयांच्या ठेवी

**सातत्यपूर्ण विश्वासार्ह कामगिरीतून नव्या उत्तुंग शिखरांकडे...!**





स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे ॲड. पटवर्धन यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाष चव्हाण, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, भाजपचे दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव आदी मान्यवर उपस्थित होते. (दुसऱ्या छायाचित्रात) रत्नागिरी जिल्हा महिला सहकारी पतसंस्थेतर्फेही ॲड. पटवर्धन यांचा सत्कार करण्यात आला.



३. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे मुख्य प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते सत्कार



४. 'टीजेएसबी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर आणि अध्यक्ष शरद गांगल यांच्या हस्ते सत्कार



५. सहकार उपनिबंधक डॉ. सोपान शिंदे यांच्या हस्ते सत्कार



६. रत्नागिरी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विलास पाटणे यांच्या हस्ते सत्कार.

## संपादकीय

# सहकार क्षितिजे विस्तारताना...

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची वाटचाल म्हणजे केवळ आर्थिक प्रगतीचा प्रवास नाही, तर विश्वास, पारदर्शकता, आपुलकी, स्नेह आणि सामाजिक बांधिलकी जपत घडलेल्या सहकार संस्कारांचा प्रवास आहे. गेल्या साडेतीन दशकांमध्ये हजारो सभासद, ठेवीदार, ग्राहक, कर्मचारी, संचालक आणि हितचिंतक यांनी या संस्थेवर दाखवलेला विश्वास आणि त्यांच्याशी तयार झालेले ऋणानुबंध हेच आमचे सर्वात मोठे बळ राहिले आहे. म्हणूनच प्रत्येक यशाचा मान हा माझा किंवा कोणत्याही एका व्यक्तीचा नसून, स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या ग्राहक सभासदांसह सर्व परिवाराचा आहे, अशी माझी भावना आहे.

संस्थेच्या यंदाच्या ठेववृद्धी मासालाही आपण सर्वांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद अत्यंत समाधानकारक आणि प्रेरणादायी ठरला. अवघ्या एका महिन्यात ३४ कोटी १९ लाख रुपयांच्या नव्या ठेवी संस्थेत जमा झाल्या, २२२५ नवीन ठेवखाती उघडली गेली आणि २६९ नवीन ठेवीदार स्वरूपानंद पतसंस्था परिवाराशी जोडले गेले. ही केवळ आकडेवारी नाही, तर संस्थेची कार्यपद्धती, आर्थिक शिस्त आणि ग्राहककेंद्री सेवा यांबद्दल आपण पुन्हा एकदा व्यक्त केलेली विश्वासाची पावती आहे. या विश्वासाबद्दल प्रत्येक ठेवीदार, सभासद आणि ग्राहकाचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

सहकार ही केवळ आर्थिक व्यवस्था नाही, तर विश्वासावर उभी राहिलेली सामाजिक चळवळ आहे. सभासद आणि संस्था यांच्यातील नाते व्यवहारापुरते मर्यादित नसते. परस्पर विश्वास, सहकार्य आणि सामूहिक प्रगतीच्या भावनेतून ते अधिक दृढ होत जाते. म्हणूनच प्रत्येक नवीन ठेवीदार म्हणजे आमच्यासाठी केवळ एक खाते क्रमांक नसतो, तर स्वरूपानंद संस्था परिवाराशी जोडले गेलेले ते एक नवीन नाते असते. ही नाती जपणे, त्यांचा विश्वास कायम राखणे आणि त्यांच्या अपेक्षांपेक्षा अधिक चांगली सेवा देणे, हेच आमच्या कामाचे खरे मोजमाप आहे.


आर्थिक व्यवहारांमध्ये विश्वास एका दिवसात निर्माण होत नाही. प्रामाणिकपणा, पारदर्शक निर्णयप्रक्रिया, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि ग्राहकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सातत्यपूर्ण वृत्तीतून तो निर्माण होतो. म्हणूनच स्वरूपानंद पतसंस्थेने नेहमीच सुरक्षितता, विश्वासार्हता आणि गुणवत्तापूर्ण सेवा यांना प्राधान्य दिले आहे. संस्थेची भक्कम आर्थिक स्थिती, वसुलीचे उत्कृष्ट प्रमाण, शून्य एनपीए आणि नियोजनबद्ध व्यवस्थापन ही त्याचीच फलश्रुती आहे.

सहकारी संस्था म्हणजे केवळ ठेवी स्वीकारणाऱ्या किंवा कर्ज देणाऱ्या संस्था नसतात. त्या स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतात, रोजगारनिर्मितीला हातभार लावतात आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे सामर्थ्य बाळगतात. म्हणूनच प्रत्येक सहकारी संस्थेने स्वतःला आर्थिकदृष्ट्या सक्षम, व्यावसायिकदृष्ट्या सक्षम आणि सामाजिकदृष्ट्या उत्तरदायी बनवणे आवश्यक आहे. सहकाराचे भवितव्य अधिक मजबूत करण्यासाठी प्रशिक्षण, सुशासन, प्रमाणबद्ध कार्यपद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार ही काळाची गरज आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्यभरातील पतसंस्थांना अधिक सक्षम, विश्वासार्ह आणि कार्यक्षम बनवण्याचे ध्येय मी समोर ठेवले आहे. संस्थाचालक आणि कर्मचाऱ्यांसाठी दर्जेदार प्रशिक्षण, एकसमान दस्तावेजीकरण आणि व्यावसायिक कार्यसंस्कृती निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. सक्षम संस्था घडवण्यासाठी सक्षम माणसे घडवावी लागतात, या विश्वासातूनच या उपक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. महाराष्ट्रातील सहकार चळवळ अधिक सुदृढ आणि भविष्याभिमुख करण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

अलीकडेच मला प्राप्त झालेला 'सहकार गौरव' हा माझा शासकीय पातळीवरचा पहिलाच पुरस्कार; मात्र माझ्यासाठी तो वैयक्तिक सन्मान नसून, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या कार्यसंस्कृतीचा, माझ्या सहकाऱ्यांच्या समर्पणाचा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आमच्यावर निस्सीम विश्वास ठेवणाऱ्या सभासद व ठेवीदारांचा गौरव आहे. या सन्मानामुळे आमची जबाबदारी अधिक वाढली आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्था आता ५०० कोटी रुपयांच्या ठेवींच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे. हा प्रवास केवळ आर्थिक टप्पे गाठण्याचा नाही, तर प्रत्येक ग्राहकाचा विश्वास अधिक दृढ करण्याचा आहे. पारदर्शकता, सुरक्षितता, उत्तम सेवा आणि सहकाराची मूल्ये जपत समाजाच्या विकासासाठी कार्यरत राहण्याचा आमचा निर्धार कायम राहील. ग्राहक-सभासदांचा विश्वास हीच आमची सर्वात मोठी ताकद आहे. गेल्या तीस वर्षांत ग्राहक-सभासदांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास हीच आमच्या प्रत्येक निर्णयामागची प्रेरणा आहे. हा विश्वास अधिक वृद्धिंगत करणे, सहकाराची मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आणि स्वरूपानंद पतसंस्थेला गुणवत्ता, विश्वासार्हता व सेवाभावाचा आदर्श म्हणून अधिक उंचीवर नेणे, हेच आमचे ध्येय आहे. त्याच विश्वासाच्या बळावर आपण यशाची आणखी नवी शिखरे निश्चितच गाठू, असा मला दृढ विश्वास आहे.



**- ॲड. दीपक पटवर्धन,**
संपादक, स्वरूप सहकार

**वर्ष : १, अंक : ४.** RNI No. MHMAR/25/A4199. जुलै २०२६. *पाने १६. *किंमत ५ रुपये

'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा' या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक सिद्धिविनायक प्रिंटर्स, कारवांचीवाडी, रत्नागिरी' येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर. **मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स. **संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२. **संपर्क :** (०२३५२) २२१२६३/२९५३६३. **वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com

**Volume : 1, Issue : 4. July 2026**

This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Siddhivinayak Printers, Karwanchiwadi, Ratnagiri and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri – 415612. **Editor :** Adv. Deepak Manohar Patwardhan. **Executive Editor :** Aniket Konkar

# ॲड. दीपक पटवर्धन यांना सहकार गौरव पुरस्कार

## सहकार क्षेत्रातील व्यापक कार्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान




**मुंबई :** ज्यांच्या कुशल नेतृत्वाखाली सातत्यपूर्ण, विश्वासार्ह आणि शिस्तबद्ध कामगिरीतून रत्नागिरीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था नवनवी यशोशिखरे गाठत आहे, ते संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा खोवला गेला आहे. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेसह सहकार क्षेत्रातील व्यापक कार्यासाठी त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सहकार गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व सहकारी महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार दिनानिमित्त (चार जुलै) आयोजित करण्यात आलेल्या सहकार गौरव समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण केंद्रामध्ये हा समारंभ पार पडला. 'सहकारात उत्तम काम करणाऱ्या व्यक्तींचा हा गौरव आहे,' असे मुख्यमंत्री या वेळी म्हणाले. पुरस्कारांचे हे पहिलेच वर्ष आहे.

या कार्यक्रमात वैयक्तिक स्तरावर महाराष्ट्रातून चार पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये सहकार महर्षी पुरस्कार विद्याधर अनास्कर यांना, सहकाररत्न पुरस्कार रेवती पैठणकर यांना, सहकारभूषण पुरस्कार आमदार विनय कोरे यांना, तर सहकार गौरव पुरस्कार देऊन ॲड. दीपक पटवर्धन यांचा सन्मान करण्यात आला. ॲड. पटवर्धन यांची अलीकडेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष म्हणूनही निवड झाली आहे. सहकार चळवळीच्या विकासातील मोलाचे योगदान, प्रभावी नेतृत्व, समर्पित कार्य आणि सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी या सगळ्याची दखल घेऊन पुरस्कार निवड समितीने ॲड. पटवर्धन यांची या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड केली. राज्य पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्यापाठोपाठ हा पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या कार्याची महती अधोरेखित झाली असून, आदर्श पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या मॉडेलचा हा गौरव आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उद्योगमंत्री आणि रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांनी केले होते. ॲड. दीपक पटवर्धन आपल्या मतदारसंघातील असल्याचा सार्थ अभिमान आहे, असे गौरवोद्गार या वेळी उदय सामंत यांनी काढले. या कार्यक्रमाला सहकार क्षेत्रातील विविध मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

या वेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'सहकारामध्ये उत्तम काम करणाऱ्या व्यक्तींच्या चांगल्या कामाला शासनाचे नेहमी पाठबळ राहील. सहकार चळवळ अतिशय जुनी आहे. सहकार क्षेत्राचे मर्म महाराष्ट्राने १२५ वर्षांपूर्वी जाणले व हळूहळू (पान ५ वर)

## ॲड. दीपक पटवर्धन यांच्या सहकार क्षेत्रातील आणि अन्य कार्याचा संक्षिप्त आढावा

** रत्नागिरीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे (कार्यक्षेत्र - महाराष्ट्र राज्य) प्रवर्तक सदस्य आणि २००१पासून अध्यक्ष. त्यांच्या नेतृत्वाखाली सातत्यपूर्ण आणि शिस्तबद्ध कार्य करताना पतसंस्थेने ग्राहकांचा विश्वास प्राप्त केला, नवनवे विक्रम केले आणि राज्य शासनाच्या 'सहकार भूषण'सह अनेक मानाचे पुरस्कारही प्राप्त केले.*

** रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे २२ वर्षांहून अधिक काळ संचालक.*

** महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे पाच वर्षे तज्ज्ञ संचालक, त्यानंतर कार्याध्यक्ष. १२ जून २०२६ रोजी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी बिनविरोध निवड.*

** रत्नागिरी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेडची स्थापना आणि २० वर्षांहून अधिक काळ अध्यक्ष.*

** रत्नागिरी जिल्हा हाउसिंग सोसायटीज फेडरेशनचे संस्थापक.*

** महाराष्ट्र राज्य हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशनचे माजी संचालक. (१० वर्षे कार्य)*

** गोवा शिपयार्ड लिमिटेडचे इंडिपेंडंट डायरेक्टर म्हणून केंद्र सरकारकडून सलग दोन वेळा नियुक्ती. (२०२२ ते २०२६)*

** १९८ वर्षे कार्यरत असलेल्या राज्यातील सर्वांत जुन्या अशा रत्नागिरी जिल्हा नगर वाचनालयाचे २००३पासून अध्यक्ष.*

** २००० ते २०१९ या काळात प्रामुख्याने सहकार क्षेत्रात वकील म्हणून कार्य.*

# सहकारी पतसंस्थांच्या प्रशिक्षणासाठी तयार करणार नेमका अभ्यासक्रम - अ‍ॅड. पटवर्धन

**रत्नागिरी :** सहकारी पतसंस्थांमध्ये कार्यरत असलेले कर्मचारी, कार्यकर्त्यांसह संस्थाचालकांसाठी बंधनकारक असलेल्या प्रशिक्षणासाठी नेमका अभ्यासक्रम लवकरात लवकर तयार केला जाणार असल्याची माहिती राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अ‍ॅड. दीपक पटवर्धन यांनी दिली. राज्यातील १९ हजार पतसंस्थांची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नागिरीचे सुपुत्र, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. दीपक पटवर्धन यांची गेल्या महिन्यात बिनविरोध निवड झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली रत्नागिरीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक कारभार करून सातत्यपूर्ण उत्तुंग कामगिरी पतसंस्था म्हणून नावारूपाला आली आहे. असे सक्षम आणि स्वच्छ प्रतिमा असलेले नेतृत्व शिखर संस्थेला लाभल्याने सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.

'पतसंस्था चळवळ अधिक विश्वासार्ह आणि कार्यक्षम होण्याकरिता नियमांची काटेकोर अंमलबजावणी, संचालक मंडळाकडून डोळसपणे काम होणे आणि नेमक्या नोंदी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने अभ्यासपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम तयार करून राज्यभर राबवण्याचा प्रयत्न केला जाईल,' असे अ‍ॅड. पटवर्धन यांनी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर लगेचच जाहीर केले होते. त्यानुसार त्यांनी या दिशेने कार्यवाही सुरू केली आहे. त्याविषयी त्यांनी अधिक माहिती दिली.

अ‍ॅड. पटवर्धन म्हणाले, 'सहकारी पतसंस्थांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व व्यक्तींना ठरावीक कालावधीने नियमितपणे प्रशिक्षण घेणे बंधनकारक असते; मात्र त्या प्रशिक्षणामध्ये आता नेमकेपणा आणला जाणार आहे. येत्या तीन महिन्यांमध्ये पतसंस्थांच्या कामकाजाचे विश्लेषण करून पतसंस्थांना आवश्यक असणाऱ्या गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमात केला जाणार आहे. त्यामुळे परफेक्ट सिलॅबस अर्थात नेमका अभ्यासक्रम तयार होणार आहे. यापुढचे अभ्यासवर्ग, प्रशिक्षण शिबिरे त्या अभ्यासक्रमाप्रमाणेच होतील. त्यामुळे त्या सगळ्या प्रशिक्षण यंत्रणेत एकसमानता येईल. पतसंस्थांना आवश्यक असणारे वेगवेगळे विषय तज्ज्ञांच्या माध्यमातून संस्थाचालकांपर्यंत आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचतील. याचा उपयोग सहकारी पतसंस्थांतील मनुष्यबळ अधिक प्रशिक्षित होण्यासाठी होणार आहे. पतसंस्था चळवळीच्या सक्षमीकरणासाठी हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे.'

पतसंस्थांमधील दस्तावेजीकरणामध्ये एकसमानता येण्याच्या दृष्टीनेही आपण प्राधान्यक्रमाने विचार करत असल्याचे अ‍ॅड. पटवर्धन यांनी सांगितले. ते म्हणाले, 'पतसंस्थांच्या कागदपत्रांचे फॉरमॅट, पतसंस्थांचे डॉक्युमेंटेशन याबाबत आतापर्यंत फारसे लक्ष दिले गेलेले नाही. आता आपण त्या विषयाकडे प्राधान्याने आणि गांभीर्याने पाहत आहोत. पतसंस्थांच्या वापरात असलेले कर्ज फॉर्म, कर्जरोखे, गहाणखत, वेगवेगळे करार अशी सगळी कागदपत्रे पतसंस्थांकरिता एका स्टँडर्ड फॉरमॅटमध्ये उपलब्ध केले जातील. त्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाईल आणि त्याआधारे सहकार खात्यालाही शिफारस करून, सहकार खात्याची मंजुरी घेऊन ते प्रसिद्ध केले जातील. हा कार्यक्रम कालबद्ध रीतीने राबवला जाईल. येत्या दोन किंवा तीन महिन्यामध्ये हा विषय मार्गी लावला जाईल.'

'पतसंस्थांचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेले आहे. १९,९७८ नागरी आणि पगारदार पतसंस्था या फेडरेशनच्या छत्राखाली काम करतात. सुमारे सहा कोटी सभासद म्हणजेच राज्याची जवळपास निम्मी लोकसंख्या या चळवळीशी जोडलेली आहे, इतकी ही चळवळ महत्त्वाची आहे. या चळवळीत चांगले घटक स्थिरावावेत आणि ती अधिक विश्वासार्ह आणि कार्यक्षम बनवण्याच्या दृष्टीने आवश्यक ते उपक्रम राबवण्याचा माझा प्रयत्न असेल. सध्याच्या आकडेवारीप्रमाणे ९०,५०० कोटी रुपयांच्या ठेवी या पतसंस्थांकडे जमा आहेत. १२०० कोटींचे भांडवल या चळवळीमध्ये नव्याने निर्माण होत आहे. आज प्रगत बँकिंगचे युग आहे. राष्ट्रीयीकृत बँका, अर्बन बँका, खासगी बँका आणि स्मॉल फायनान्स बँकांचे मोठे जाळे असूनही, राज्यात एवढ्या पतसंस्था कार्यरत आहेत, म्हणजेच या व्यवस्थेवर जनसामान्यांचा प्रचंड विश्वास आहे,' असे अ‍ॅड. पटवर्धन म्हणाले.

---

◂ पान ४ वरून वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार मोठा झाला. पहिली सहकारी पेढी १९०४मध्ये सुरू झाली. सहकारातील पहिली ग्रामीण पेढी कोकणातील कणकवलीत सुरू झाली. त्यानंतर भारतात मोठ्या प्रमाणावर सहकार सुरू झाला. देशात सर्वाधिक मजबुतीने सहकार महाराष्ट्रात रुजला. दोन लाखांहून अधिक वेगवेगळ्या सहकारी संस्था महाराष्ट्रात आहेत.'

फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला १०७ वर्षे झाली. हा मोठी उज्ज्वल परंपरा असलेला सहकारी संघ आहे. त्या माध्यमातून प्रवीण दरेकर यांनी उत्तम काम सुरू केले आहे. संघाच्या माध्यमातून सहकाराला नवीन दिशा देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीने सहकाराच्या क्षेत्रात प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण केले पाहिजेत. यासाठी पूर्वी जो शिक्षण निधी मिळायचा तो बंद झाला आहे. तो शिक्षण निधी पुन्हा सुरू झाला पाहिजे. येत्या महिन्याभरात याचा निर्णय घेऊ.'

'पाच वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहकारी चळवळीची ताकद ओळखली व सहा जुलै २०२१ रोजी देशात पहिल्यांदा स्वतंत्र सहकार मंत्रालय तयार केले. पहिले सहकार मंत्री केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना केले. अमित शहा यांना सहकाराचा पूर्ण अनुभव आहे. जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले होते. वेगवेगळ्या सहकारी संस्थामध्येही काम केले आहे. यातून हे सहकार क्षेत्र तयार झाले असून, राष्ट्रीय सहकार धोरणही जाहीर झाले आहे. या धोरणात पुढील २० वर्षांमध्ये जीडीपीत सहकाराचा हिस्सा ३ पटीने वाढवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे,' असेही फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

# सहकारी संस्थांनी स्वतःला सक्षम पायावर उभे करणे आवश्यक - ॲड. दीपक पटवर्धन

**केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकार मेळावा आयोजित केला होता. 'सहकाराच्या माध्यमातून सहकारी संस्थांचे सक्षमीकरण, ग्रामीण विकास व व्यवसायवृद्धी' या विषयावर या वेळी मान्यवरांनी आपली मते व्यक्त केली. बँकेचे उपाध्यक्ष बाबाजीराव जाधव मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होते. सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यावर सहकार क्षेत्रात झालेल्या बदलांविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर गिम्हवणेकर, बँकेचे संचालक आणि स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन, बँकेचे संचालक रामभाऊ गराटे, अमजद बोरकर, आबा टिळेकर, सौ. नेहा माने, गजानन पाटील, मंदार सप्रे आदींसह अन्य संचालक आणि जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे प्रतिनिधी आणि सहकार क्षेत्रातील मान्यवर या मेळाव्याला उपस्थित होते.**

**या वेळी बँकेचे संचालक ॲड. दीपक पटवर्धन यांनी 'सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकाराचा विकास' या विषयावर केलेले भाषण सहकार क्षेत्राला नवी दिशा दाखवणारे होते. या भाषणाचा हा संपादित अंश :**




पाच वर्षांपूर्वी केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना केली. त्या औचित्याने २९ जून ते सहा जुलै या कालावधीत सहकार सप्ताह साजरा केला जातो. त्या अनुषंगाने हा सहकार मेळावा ठिकाणी आयोजित केलेला आहे. केंद्राने सहकार मंत्रालय स्थापन केलं, त्या वेळी माझ्यासारख्या कार्यकर्त्याच्या मनात प्रश्न आला, की मी नागरिकशास्त्रात शिकलोय त्याप्रमाणे सहकार हा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत येतो. अशा वेळी केंद्र शासनाने स्वतःचं मंत्रालय तयार करण्याचं कारण काय? अनेक शंका मनाला भेडसावून जात होत्या; पण गेल्या पाच वर्षांमध्ये सहकारासंदर्भात झालेले निर्णय प्रामुख्याने गावपातळीवर सहकाराचं महत्त्व अधोरेखित करणारे आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या सहकारी संस्थांना अधिक मोठ्या प्रमाणावर चालना मिळावी या दृष्टीने अनेकविध विषय केंद्र शासनाच्या सहकार विभागाच्या माध्यमातून कार्यरत झाले.

विविध कार्यकारी सहकारी संस्थांना एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहून त्यांचं मार्गक्रमण अधिक प्रगतिशील पद्धतीने व्हावं, अशा पद्धतीच्या योजना आखल्या गेल्या. कम्प्युटरायझेशन, तेही सेंट्रल सॉफ्टवेअरच्या माध्यमातून करून, त्या माध्यमातून गावातली संस्था थेट दिल्लीपर्यंत जोडली जावी अशा पद्धतीची यंत्रणा कार्यान्वित करण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. महाराष्ट्रामध्ये त्या संदर्भातलं काम अत्यंत उत्तम पद्धतीने चालू आहे, असं सरकारी आकडेवारी सांगते.

विविध कार्यकारी संस्थांना वेगवेगळ्या प्रकारचे ११५ उद्योग त्यांच्या माध्यमातून सुरू करण्याची तरतूद याच केंद्रीय मंत्रालयाने केली. विविध कार्यकारी संस्थांच्या माध्यमातून गावोगावी विविध उद्योग सुरू व्हावेत असा प्रयत्नही झाला. मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या बाबतीत एक वेगळं धोरण आणलं गेलं. अर्बन बँकांच्या संदर्भाने वेगवेगळे विषय हाताळले गेले. एक कोटी कॅश हँडलिंगची मर्यादा तीन कोटी रुपयांपर्यंत करण्यात आली. प्रामुख्याने ग्रामपातळीवर वेअरहाउसेस स्थापन व्हावीत, म्हणून वेगळ्या योजना राबवल्या गेल्या.

या योजनांचा उपयोग करून राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेल्या सहकारी संस्थांना बळ देण्याचं काम या मंत्रालयाने केलं हे कोणीही नाकारू शकणार नाही. पाच वर्षं पूर्ण होत असताना सर्व आढावा घ्यावा, सहकारामध्ये काम करताना सहकारी संस्थांना एकत्रित येण्यासाठी कोणतातरी कार्यक्रम करावा आणि त्या माध्यमातून सहकारी संस्थांच्या मार्गक्रमणाबद्दल अभिसरण व्हावं या उद्देशाने अशा प्रकारचे मेळावे संपूर्ण राज्यभर, संपूर्ण देशभर विविध ठिकाणी चालू आहेत. 'सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकाराचा विकास' हा विषय मी मांडणार आहे.

सहकार म्हटलं, की पश्चिम महाराष्ट्र नजरेसमोर येतो. मोठमोठे साखर कारखाने, मोठमोठ्या बँका, मोठमोठ्या पतसंस्था आणि या सगळ्याच्या माध्यमातून गावाचा झालेला चांगल्या पद्धतीचा विकास, हे मॉडेल आपल्या सर्वांच्या सहजपणे दृष्टोत्पत्तीस येतं आणि त्या मानाने आपल्या कोकणामध्ये या सहकाराचा प्रसार झाला नाही का, असा प्रश्न आपल्या सर्वांना पडतो. आजचं जग हे प्रेझेंटेशनच्या प्रतिमेवर चाललेलं असतं. सहकाराचा विकास म्हटलं, की आपल्या मनामध्ये पश्चिम महाराष्ट्राचा प्रदेश, अनेक मोठमोठी नावं येतात आणि त्यामुळे आपल्या मनात सहकारासंदर्भात पश्चिम महाराष्ट्राची विशिष्ट अशी इमेज निर्माण होते.

पण रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक महाराष्ट्राचा विचार करता दुसऱ्या क्रमांकाची

बँक ठरते. इतका प्रगत सहकार रत्नागिरीसारख्या, सहकाराच्या दृष्टीने एका खडकाळ असणाऱ्या प्रदेशामध्ये निर्माण झाला आहे. ज्या जिल्ह्यामध्ये त्या जिल्ह्याची शिखर म्हणजे मध्यवर्ती सहकारी बँक उत्तम अर्थकारण करत असते, विविध योजनांच्या माध्यमातून सहकारी संस्थांना पूरक ठरावं अशा पद्धतीचं काम करते, एक प्रकारे त्यांचं पालकत्व घेऊन ज्या जिल्ह्यामध्ये मध्यवर्ती सहकारी बँक काम करते, त्या जिल्ह्यामध्ये सहकाराला पोषक असं वातावरण निर्माण होतं, असं म्हटलं तर अयोग्य ठरणार नाही.



राज्य पतसंस्था फेडरेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रात वेळोवेळी अनेक ठिकाणी जाण्याची वेळ आली. राज्याचा अध्यक्ष झाल्यानंतर पहिलाच प्रश्न माझ्याकडे आला, तो म्हणजे मलकापूर अर्बन बँकेमध्ये अडकलेले पैसे आणि नाशिक मध्यवर्ती बँकेमध्ये पतसंस्थांचे अडकलेले साडेतीनशे कोटी रुपये. नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँक ठप्प होऊन मला वाटतं जवळपास सात-आठ वर्षं झाली. सहकार कायद्याप्रमाणे मध्यवर्ती बँकेमध्ये पैसे ठेवायला कोणती अडचण नाही, किंबहुना सहकार कायद्यातलं कलम ७० हे मध्यवर्ती सहकारी बँकेला प्राधान्य द्यावं, असं सहकारी संस्थांना सांगतं.

अशाच वेळी नाशिकसारख्या मोठ्या ठिकाणची मध्यवर्ती बँक सहकारी संस्थांचे डिपॉझिट म्हणून जमा केलेले पैसे त्या संस्थांच्या गरजेप्रमाणे परत देऊ शकत नाही. अशी अवस्था महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये आहे. आपण सर्व जण भाग्यवान आहोत, की आपली मध्यवर्ती सहकारी बँक विशेष बाब घेऊनसुद्धा ३० टक्क्यांपर्यंतचा डिव्हिडंड देऊ शकते. एवढी आर्थिक ताकद आपल्या बँकेत निर्माण झाली आहे. सहकाराचा विकास करायचा असेल, तर सहकारी संस्था उत्तम आर्थिक पायावर उभी करणं हे तुमच्या-माझ्यासारख्या कार्यकर्त्यांचं काम आहे.

सहकाराच्या माध्यमातून सहकाराचा विकास होत असतो, ही पुढची पायरी झाली; पण सहकार करत असताना (पान ८ वर) ▸

# ठेववृद्धी मास उपक्रमात ३४.१९ कोटी रुपयांच्या ठेवी

**रत्नागिरी :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या ठेववृद्धी मास उपक्रमाला यंदा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. २० जून ते २० जुलै २०२६ या कालावधीत राबवण्यात आलेल्या या उपक्रमात संस्थेच्या विविध ठेव योजनांमध्ये ३४ कोटी १९ लाख रुपयांच्या नव्या ठेवी जमा झाल्या. या ठेवींमध्ये नव्याने जमा झालेल्या २२२५ ठेवींचा समावेश आहे. या मासामध्ये २६९ नवीन ठेवीदार संस्थेशी जोडले गेले. ठेववृद्धी मास उपक्रमाला मिळणाऱ्या प्रतिसादात दर वर्षी वाढ होत असून, गेल्या वर्षीच्या उपक्रमात ३०.०८ कोटी रुपयांच्या नव्या ठेवी जमा झाल्या होत्या.

यंदाच्या ठेववृद्धी मासाच्या प्रारंभी संस्थेच्या एकूण ठेवी ४१४ कोटी रुपये होत्या. अवघ्या एका महिन्यात त्यामध्ये लक्षणीय वाढ होऊन २० जुलैअखेर संस्थेच्या ठेवी ४४६ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. संस्थेच्या सर्व १७ शाखांमध्ये ठेववृद्धी मासाला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. पतसंस्था आता ५०० कोटी रुपयांच्या ठेवींच्या महत्त्वपूर्ण टप्प्याकडे दमदार वाटचाल करत आहे. *(यंदाच्या ठेववृद्धी मासातील कामगिरीचे इन्फोग्राफिक पान क्रमांक १४वर दिले आहे.)*

संस्थेची विश्वासार्ह प्रतिमा, आर्थिक शिस्त, पारदर्शक व्यवस्थापन आणि उत्तम ग्राहक सेवा यामुळे ठेवीदारांचा संस्थेवरील विश्वास दिवसेंदिवस दृढ होत आहे. संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असून, ९९.७८ टक्के वसुली, शून्य टक्के एनपीए, २७ टक्के सीआरएआर, २०० कोटी रुपयांची बँक गुंतवणूक आणि ३०७ कोटी रुपयांचे कर्जवाटप अशी संस्थेची ताजी आकडेवारी आहे. अशा प्रकारची उल्लेखनीय आर्थिक स्थिती संस्थेने कायम राखली आहे. या भक्कम आर्थिक पायावर आणि ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर संस्थेची प्रगती सातत्याने सुरू आहे, असे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी सांगितले. 'ठेवीदारांचा विश्वास जपणे आणि त्यांना सुरक्षित, विश्वासार्ह व गुणवत्तापूर्ण सेवा देणे यालाच संस्थेचे सर्वोच्च प्राधान्य आहे. ग्राहकांच्या या विश्वासाच्या बळावर स्वरूपानंद पतसंस्था ५०० कोटी रुपयांच्या ठेवींच्या दिशेने वाटचाल करत असून, भविष्यातही संस्थेच्या प्रत्येक उपक्रमाला असाच उत्तम प्रतिसाद मिळेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पान ७ वरून वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्था निर्माण करणं आणि त्या संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी सभासदांना बरोबर घेऊन, त्यांच्या माध्यमातून भांडवलनिर्मिती करून उद्दिष्टपूर्तीसाठी काम करणं ही सहकारासाठी अत्यंत आवश्यक असणारी गोष्ट आहे. मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून विविध प्रकारची कर्जं घेऊन अनेक पगारदार पतसंस्था मोठ्या प्रमाणावर आपले व्यवहार करतात. या पतसंस्थांच्या माध्यमातून कर्मचारी वर्गाच्या आर्थिक गरजा पूर्ण होत आहेत.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या शेती कर्जाकरिता असेल किंवा अन्य सामग्रीसाठी असेल, मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून आपण काम करतो. नागरी सहकारी पतसंस्थांनाही वेगवेगळ्या प्रकारची कॅश क्रेडिट स्वरूपाची कर्जही बँकेच्या माध्यमातून मिळत आहेत. एक मध्यवर्ती बँक सक्षम पद्धतीने उभी असेल, तर त्या बँकेच्या छत्रछायेखाली या जिल्ह्यातल्या दोन हजारांहून अधिक संस्था त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये चांगल्या पद्धतीचं काम करतायत आणि याच्यातच सहकाराचा विकास आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

ग्रामीण भागामध्ये विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून कर्जपुरवठा होत असतो, त्या कर्जपुरवठ्याच्या माध्यमातून त्या गावातलं अर्थकारण अधिक मोठ्या प्रमाणावर प्रसरण पावत असतं आणि ही सहकाराची किमया आहे. कारण या सहकाराच्या व्यवस्थेमध्ये सरकारचा थेट हस्तक्षेप नाही. एकमेकांना बरोबर घेऊन, एकमेकांना विश्वासात घेऊन, एक प्रकारची योजना तयार करून तिची व्यवस्था लावून भांडवलनिर्मिती केली जाते आणि त्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना कार्यान्वित होतात. हे करण्याची क्षमता या सहकारी संस्थांमध्ये असते आणि त्यातच विकासाची पाळंमुळं रुजलेली आहेत. एक छोटसं उदाहरण सांगतो, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचं कार्यालय ३० वर्षांपूर्वी रत्नागिरी हेड पोस्ट ऑफिसच्या समोर पाथरे कॉम्प्लेक्स नावाच्या जुन्या बिल्डिंगमध्ये २०० चौरस फुटांच्या जागेत सुरू केलं.

आताची रत्नागिरी आणि ३० वर्षांपूर्वीची रत्नागिरी याच्यामधला फरक सहजपणे लक्षात येणारा आहे. हेड पोस्ट ऑफिसच्या शेजारी आता रिक्षा स्टॉप आहे, त्या ठिकाणी अनेक




रिक्षा उभ्या असतात; पण त्या वेळी त्या स्टॉपवर एखाद-दुसरीच रिक्षा असायची. मी एकदा सहज म्हणून संस्थेचं काम आटोपून समोर उभा होतो, त्या वेळी दोन रिक्षावाल्यांमधलं बोलणं ऐकलं आणि माझ्या लक्षात आलं, की केवळ आपण अर्थकारण करतो, कर्जव्यवहार करतो किंवा ठेवी जमवतो याच्यापेक्षाही या सहकारी संस्थांचा अधिक प्रभाव असतो.

त्या रिक्षावाल्यांचं बोलणं असं होतं, की 'आजपर्यंत मी एसटी स्टँडवर माझी रिक्षा लावत होतो; पण आता मी पोस्टाजवळ रिक्षा लावायला लागलोय. तूही आता इथेच तुझी रिक्षा लाव. याचं कारण स्वरूपानंद पतसंस्था म्हणून नवीन एक संस्था इथे आली आहे. तिथून येणारे ग्राहक समोर येऊन रिक्षात झटकन बसतात. आपल्याला फार वेळ वेटिंग करावं लागत नाही.' हा विकास अशाच पद्धतीने होत असतो. स्वरूपानंद पतसंस्थेचं ऑफिस त्या ठिकाणी उभारलं, लोकांना बरं वाटलं, ग्राहक येऊ लागले; पण याचा अप्रत्यक्ष फायदा समाजातल्या अन्य घटकांनाही होत होता. सहकारी संस्थांचं प्रभावक्षेत्र हे आपल्याला लक्षात येणार नाही इतक्या प्रमाणात प्रसरित होत असतं.

त्यामुळे सहकारी संस्थांच्या माध्यमातून होणारं काम हे त्या भागाच्या विकासासाठी पूरक असतं. रत्नागिरीचा विचार करता शिखर बँक चांगली आहे, अर्बन बँकांचं काम उत्तम आहे, मोठ्या पतसंस्था काम करतायत. या सर्वांच्या माध्यमातून काही रचनात्मक काम एकत्र येऊन करता आलं, तर सहकारांतर्गत सहकार्याच्या माध्यमातून आपल्याला या रत्नागिरीच्या विकासाला नवीन दिशा देता येईल. आपल्या प्रत्येक संस्थेकडे ज्या पद्धतीने नफा होतो, त्या प्रमाणात आपण काही खर्च सामाजिक दायित्वासाठी (CSR) करत असतो; पण सहकारांतर्गत सहकार म्हणून सर्व संस्थांचा नफा एकत्र आणून, सहकार कायद्याला अपेक्षित असलेला एक मोठा धनसंचय केला आणि त्या माध्यमातून सर्वांना लाभ होईल अशा पद्धतीचं काही काम करता आलं, तर विकासाचं पुढचं पाऊल टाकता येईल.

हे विकासाचं पाऊल आपल्याला टाकायचं असेल, तर सहकारी संस्थांनी स्वतःला सक्षम पायावर उभं करणं आवश्यक असतं. पूर्वीच्या काळी 'सहकारी संस्थांना नफा होता कामा नये' असा एक दृष्टिकोन होता; मात्र हा दृष्टिकोन चुकीचा आहे. सहकारी संस्थांनी आपल्याकडची साधनं आणि पैसा योग्य पद्धतीने वापरात आणला आणि त्याला गतिमानता दिली, तर संस्थांना चांगल्या प्रकारचा लाभ प्राप्त करता येतो. कुठल्याही व्यवस्थेला अधिक पुढची झेप घ्यायची असेल, तर ती संस्था नफ्यात असण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे व्यावसायिकता आणि बदलणारं जग लक्षात घेऊन सहकारी संस्थांनी आपापल्या मार्गक्रमणात आवश्यक बदल केले, तर विकासाची गंगा यायला वेळ लागणार नाही.

कोकणामध्येही सहकाराचे चांगल्या प्रकारचे संस्कार आहेत. खेडोपाड्यात आणि शहरी भागात चाललेल्या संस्थांनी विशिष्ट उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून मार्गक्रमण केलं, तर अपेक्षित विकास सहजपणे साधता येईल. या सहकार मेळाव्याच्या निमित्ताने आपण सर्व जण एकत्र आलो आहोत. ही एकमेकांशी चर्चा करण्याची आणि चांगले कार्यक्रम राबवण्याची व अडचणी समजून घेण्याची एक संधी आहे. या चर्चेच्या अभिसरणामधून आपण नवीन विषय निर्माण केला, तर कोकणातल्या सहकाराला एक नवं वळण देण्याचं सामर्थ्य आपल्या सर्वांमध्ये आहे. आपणा सर्वांना मनापासून शुभेच्छा! जय हिंद, जय सहकार!

# आपुलकीची आणि तत्पर सेवा



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था सुरू झाली, तेव्हापासून आम्ही पती-पत्नी पतसंस्थेचे ग्राहक आणि शेअर होल्डर आहोत. या पतसंस्थेचा मला असलेला अनुभव अतिशय चांगला आहे. २०२० साली माझे पती सुधाकर भावे यांचे निधन झाले. तेव्हा कोरोनाचा कालखंड सुरू होता. मी पुण्यात माझ्या मुलीकडे होते. तेव्हा मला पैसे गुंतवायचे होते आणि पतसंस्थेच्या ठेववृद्धी मासाबद्दल कळले होते. म्हणून मी पटवर्धन साहेबांशी संपर्क साधला. तेव्हा त्यांनी इतकी छान व्यवस्था केली, की पुण्यातील शाखेतील कर्मचारी तिथे घरी येऊन सर्व फॉर्म वगैरे आवश्यक बाबींची पूर्तता करून गेला आणि त्याच दिवशी संध्याकाळी माझ्या मारुती मंदिर शाखेत एफडी सुरू झाल्याचा मेसेज मला आला. मी वयाची पंच्याहत्तरी ओलांडली आहे. ज्येष्ठ नागरिक म्हणून मला स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या सर्व सेवा अगदी घरपोच, विनासायास, तत्पर आणि आपुलकीने मिळतात, हे वैशिष्ट्य आहे. त्यात एनईएफटी, एफडी रिन्यूअल, पैसे काढणे, पासबुक भरणे वगैरे गोष्टींचा समावेश आहे. पतसंस्थेचा कर्मचारीवर्ग चांगला आहे. बदली होऊन कोणी नवे कर्मचारी आले, तरी आपुलकीची सेवा कायम मिळते, हे विशेष. आमच्या मोठ्या ठेवी याच पतसंस्थेत आहेत. विशेष गुंतवणूकदार म्हणून आम्हाला सर्टिफिकेटही मिळाले असून, ते मी शोकेसमध्येच ठेवले आहे.

माझे पती वकील होते. त्यामुळे पटवर्धन साहेबांशी त्यांची घनिष्ठ मैत्री होती. आजही मी कधीही मेसेज केला, तरी व्यग्र वेळापत्रकातून वेळ काढून पटवर्धन साहेब नक्की प्रतिसाद देतात. एकंदरीतच, या आपुलकीच्या आणि विश्वासार्ह सेवेबद्दल मी पटवर्धन साहेबांची आणि संस्थेची आभारी आहे.

**– मेघा सुधाकर भावे**

................

# कधीही कटू अनुभव नाही



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था कोकणातील अग्रगण्य पतसंस्था असून, पटवर्धन साहेबांच्या कुशल नेतृत्वामुळे पतसंस्था मोठी गरूडझेप घेऊ शकली. संस्थेचा कर्मचारीवर्ग अत्यंत सहकार्य करणारा आहे. त्यामुळे ग्राहक आणि संस्था यांच्यामध्ये अतूट नाते तयार झालेले आहे. या नात्याला संस्थेने कधीही तडा जाऊ दिलेला नाही. लोकांचा विश्वास संस्थेने आपल्या कर्तृत्वाने मिळवला आहे. लोकांना चांगले व्याजदर मिळू शकतील, यासाठी ठेववृद्धी मास हा चांगला पर्याय संस्थेने दिला आहे आणि तो कायम राखलेला आहे. ही कौटुंबिक संस्था असल्यासारखेच आम्हाला वाटते. तेथील कर्मचारी सहकार्य करणारे आहेत. ग्राहकसेवेचे चांगले कौशल्य त्यांच्याकडे आहे. एकंदरीत संस्थेबद्दल माझे अतिशय सकारात्मक मत आहे. माझे वय ५७ वर्षे असून, माझे संपूर्ण कुटुंब या पतसंस्थेचे सभासद आहे. संस्थेशी आमचे २५ वर्षांचे दृढ नाते आहे. ग्राहक म्हणून आम्हाला कधीही कटू अनुभव आलेला नाही. काही अडचणी आल्या, तर त्या सोडवायला कायम मदत केली जाते. आरटीजीएस, एनईएफटी सेवाही येथे शक्य तितक्या वेगात होते आणि त्या संदर्भात संस्थेने जो काही शब्द दिलेला असतो, तो तंतोतंत पाळला जातो, असा माझा अनुभव आहे.

**– मकरंद लिमये, रत्नागिरी**

................

# सर्व कुटुंबीयांच्या ठेवी




आम्ही पती-पत्नी आणि दोन मुली अशा चौघांच्याही नावे ठेववृद्धी मासात ठेवी ठेवतो. मुलींचे विवाह झाले आहेत; मात्र त्यांना सुरुवातीपासूनच इथे ठेवी ठेवण्याची सवय लावलेली आहे. त्यामुळे त्यांच्याही ठेवी इथेच असतात. सर्व कुटुंबीयांच्या ठेवी असल्याबद्दल आमचा संस्थेतर्फे सत्कारही झाला होता. संस्थेचे व्यवहार प्रामाणिक आणि सचोटीचे आहेत. विश्वासार्हता हे या संस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आम्ही किमान १५ वर्षे संस्थेचे सभासद आहोत. अन्य वित्तीय संस्थांच्या तुलनेत या संस्थेची सेवा अत्यंत आपुलकीची आहे. सर्व कामे वेळच्या वेळी होतात. एकंदरीतच सेवा अत्यंत समाधानकारक आहे. संस्थेची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशा शुभेच्छा!

**– प्रभाकर करंबेळकर, रत्नागिरी**

................

# उत्तम विश्वासार्हता जपलेली संस्था



मी ७६ वर्षांचा असून, सहकार क्षेत्रातील शासकीय लेखापरीक्षक म्हणून कार्यरत होतो. लेखापरीक्षणानिमित्त माझा विविध संस्थांशी संपर्क येत होता. पटवर्धन साहेबांच्या वडिलांपासूनच माझा त्यांच्याशी परिचय आहे. कारण तेही सहकार क्षेत्रातच होते. मी सेवेत होतो, तेव्हा अंदाजे २००४-०५च्या सुमारास स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे एका वर्षाचे ऑडिट करायची संधी मिळाली होती. पतसंस्था म्हटली, की अनेकांचा तिकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक असतो. इतिहासात पतसंस्था क्षेत्रात ज्या काही घटना घडून गेलेल्या आहेत, त्या चांगल्या नाहीत; पण स्वरूपानंद पतसंस्था त्याला अपवाद आहे. ही महाराष्ट्रातील एकमेव अशी संस्था आहे, की ३१ मार्चला ताळेबंद पूर्ण असतो. कामकाज अत्यंत उत्तमरीत्या चालते. या संस्थेच्या ठेववृद्धी योजनेला लोकांचा भरघोस पाठिंबा मिळतो. त्यामुळे चांगल्या ठेवी जमतात. संस्थेने विश्वासार्हता उत्तम प्रकारे जपली आहे. नीटनेटकी, नियमाने चालणारी,

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८


सभासदांचे समाधान करणारी, त्यांची आर्थिक उन्नती करणारी अशी ही संस्था आहे.

कमी काळात या संस्थेने आपली विश्वासार्हता उत्तमरीत्या तयार केली आहे. अशी कामगिरी एवढ्या कमी वेळात करणारी दुसरी संस्था माझ्या पाहण्यात नाही. संस्थेची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. ऑडिटमध्ये सातत्याने अ वर्ग मिळवणारी ही संस्था असून, तिच्या बॅलन्सशीटमध्ये कोणत्याही प्रकारची लपवाछपवी केलेली नसते. संस्थेचे व्यवहार पारदर्शक असल्याने लोकांनी निर्विवादपणे या पतसंस्थेवर विश्वास ठेवून येथील आर्थिक व्यवहारांना आपल्या ताकदीनुसार जोड द्यावी. मीही ठेवीदार म्हणून संस्थेशी जोडला गेलेलो आहे. पटवर्धन साहेबांना आणि पतसंस्थेच्या सर्व टीमला खूप शुभेच्छा!

**– विलास विष्णू कुलकर्णी**

..................

# नावाला साजेसे कार्य



आता आगाशे स्टोअर्स या नावाने आमची फर्म आहे; मात्र पूर्वी अनंत वस्तू भांडार नावाने आमचे दुकान होते, तेव्हापासून म्हणजे साधारण २००८-०९पासून आम्ही स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेत ठेवी ठेवत आहोत. त्याची सुरुवात पिग्मी खात्यापासून झाली. पटवर्धन साहेबांशी माझी तेव्हा थेट ओळख नव्हती; पण मित्रांकडून त्यांच्या कामाबद्दल कळत होते. स्वामी स्वरूपानंद हे आमचे गुरू. त्यामुळे त्यांच्या नावाच्या संस्थेत वावगे काही होणारच नाही, याचा विश्वास होता. या विश्वासातूनच आम्ही इथे ठेवी ठेवू लागलो. तेव्हा आमच्या मोठ्या ठेवी अन्य बँकेत होत्या; मात्र अन्य बँका आणि ही संस्था यातील फरक म्हणजे स्थानिक संस्था असल्याने थेट मोठ्या पदावरील व्यक्तींशी संपर्क साधता येतो. नंतर हळूहळू पटवर्धन साहेबांशी जवळून ओळख होत गेली. एकाच विचारसरणीचे असल्याने धागा जुळत गेला. नगर वाचनालयाच्या माध्यमातून ते करत असलेल्या सामाजिक कार्यांमध्येही सहभागी होत होतो. उत्तम अनुभवाच्या आधारे स्वरूपानंद पतसंस्थेच्या ठेवी वाढवत नेल्या. आजच्या घडीला मी, पत्नी आणि कुटुंबीयांच्या सुमारे ७० टक्के ठेवी स्वरूपानंद पतसंस्थेतच आहेत. फक्त बँकेतच मिळणाऱ्या काही सुविधा वगळता सर्वच सुविधा इथे मिळतात. पुढे माझा मुलगा गौरांग याने अनबॉक्स नावाचा स्टार्टअप उद्योग सुरू केला, तेव्हा आमच्या ठेवी या संस्थेत असल्याचा उपयोग त्याला कर्ज मिळण्यासाठी झाला. विश्वासार्हता, पारदर्शकता आणि प्रत्यक्ष ओळख ही या संस्थेची अत्यंत महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

**– अनंत मुकुंद आगाशे**

# आर्थिक सामर्थ्याची झलक

२३ जुलै २०२६ अखेर

| ठेवी | वितरित कर्जे | गुंतवणूक |
|---|---|---|
| ₹ ४४६.०७ कोटी | ₹ ३०७.५२ कोटी | ₹ २०२.०३ कोटी |

| खेळते भांडवल | स्वनिधी | निव्वळ नफा |
|---|---|---|
| ₹ ५०९.४३ कोटी | ₹ ५४.६४ कोटी | ₹ १०.९४ कोटी (२०२५-२६) |

## महत्त्वाचे निर्देशक

| वसुलीचे प्रमाण | सीडी रेशो | सीआरएआर | ऑडिट वर्ग |
|---|---|---|---|
| ९९.७८% | ६४.८५% | २८.५५% | अ (२०२४-२५) |

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी**

* सर्व आकडे २३ जुलै २०२६ अखेरपर्यंतचे आहेत.

# आर्थिक प्रगतीवर एक नजर

## २०२१-२२ ते २०२५-२६

विश्वासातून सातत्यपूर्ण आर्थिक वाढ

### २०२१-२२
- ठेवी ₹२५०.३१ कोटी
- वितरित कर्जे ₹१७०.५१ कोटी
- गुंतवणूक ₹११९.६९ कोटी
- निव्वळ नफा ₹६.२१ कोटी

### २०२२-२३
- ठेवी ₹२६५.०७ कोटी
- वितरित कर्जे ₹१८२.०१ कोटी
- गुंतवणूक ₹१३१.०६ कोटी
- निव्वळ नफा ₹६.६१ कोटी

### २०२३-२४
- ठेवी ₹३०८.८० कोटी
- वितरित कर्जे ₹२१५.१० कोटी
- गुंतवणूक ₹१५०.६८ कोटी
- निव्वळ नफा ₹७.०३ कोटी

### २०२४-२५
- ठेवी ₹३४६.२१ कोटी
- वितरित कर्जे ₹२५२.६४ कोटी
- गुंतवणूक ₹१४९.३३ कोटी
- निव्वळ नफा ₹८.३२ कोटी

### २०२५-२६
- ठेवी ₹४०८.८८ कोटी
- वितरित कर्जे ₹३०२.६५ कोटी
- गुंतवणूक ₹१६९.२९ कोटी
- निव्वळ नफा ₹१०.९४ कोटी

## प्रमुख आर्थिक निर्देशकांची वाढ




**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी**


२०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीतील आर्थिक प्रगतीचा आढावा

# विश्वासाचे भक्कम आधारस्तंभ

संस्थेच्या आर्थिक गुणवत्तेची साक्ष देणारे प्रमुख निर्देशक


## प्रमुख आर्थिक निर्देशक

### वसुलीचे प्रमाण





सर्वाधिक **99.82%** (2025-26)

### सीडी रेशो




सर्वाधिक **65.01%** (2025-26)

### सीआरएआर




सद्यस्थिती **27.82%** (2025-26)

### ऑडिट वर्ग


| अ | अ | अ | अ |
|---|---|---|---|
| 2021-22 | 2022-23 | 2023-24 | 2024-25 |

सातत्याने ऑडिटचा 'अ' वर्ग

## आर्थिक बळकटीची वाढती वाटचाल

### स्वनिधीची वाढ


(रक्कम : कोटी रुपये)




५ वर्षात सुमारे ७२% वाढ

### खेळते भांडवल

(रक्कम : कोटी रुपये)




५ वर्षात सुमारे ६५% वाढ

## ठळक कामगिरी

- सातत्याने शून्य टक्के एनपीए
- वसुलीचे प्रमाण ९९% पेक्षा अधिक
- सीडी रेशोमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा
- स्वनिधीत सुमारे ७२% वाढ
- खेळत्या भांडवलात सुमारे ६५% वाढ

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

२०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत सातत्याने मजबूत झालेली आर्थिक गुणवत्ता

स्वामी स्वरूपानंद
सहकारी पतसंस्था, रत्नागिरी

# ठेववृद्धी मास

## २० जून ते २० जुलै २०२६

## ₹ ३४.१९ कोटी

१७ शाखांचे
योगदान

विश्वास • सहकार • समृद्धी • सेवा

| | शाखा | जमा ठेवी (₹) | नवीन ठेव खाती | नवीन सभासद |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | ६,८५,६१,४९३ | ३५६ | ३४ |
| 2 | पावस | ३,१५,८२,५७० | २७२ | ३१ |
| 3 | जाकादेवी | १,२६,९३,२०० | १२६ | १२ |
| 4 | कुवारबाव | ३,२०,६४,३०० | १४९ | ११ |
| 5 | खंडाळा | १,२६,६०,००० | १०६ | ३ |
| 6 | चिपळूण | ७५,३६,५०० | ५७ | ४ |
| 7 | पाली | ६८,६९,५०० | ८९ | ६ |
| 8 | साखरपा | ७५,१७,५०० | ८० | १२ |
| 9 | नाटे | १,१२,३३,६८३ | ९३ | ७ |
| 10 | मारुती मंदिर | ४,५४,४५,००० | २३० | २७ |
| 11 | मालगुंड | १,२९,४५,००० | ९० | ७ |
| 12 | लांजा | २९,५०,००० | ३९ | ७ |
| 13 | राजापूर | २,५९,७९,५०० | ११४ | १३ |
| 14 | पुणे | १,९३,२२,००० | १३९ | ४३ |
| 15 | कोकणनगर | २,०४,५९,००० | १०७ | २० |
| 16 | देवगड | १,४०,६३,००० | ८८ | १९ |
| 17 | देवरूख | १,००,३७,००० | ९० | १३ |

एकूण जमा ठेवी ₹ ३४,१९,१९,२४६ | नवीन ठेव खाती २२२५ | नवीन सभासद २६९

₹ जमा ठेवी — नवीन ठेव खाती — नवीन सभासद



१. लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'स्वराज्य पर्व' या कार्यक्रमासाठी रत्नागिरीत आलेले माजी केंद्रीय मंत्री अश्विनीकुमार चौबे यांचे ॲड. दीपक पटवर्धन यांनी स्वागत केले.




२. केंद्रीय सहकार मंत्रालयाला स्थापनेला पाच वर्षे झाल्यानिमित्त २९ जून ते ६ जुलै २०२६ या कालावधीत राज्यात सहकार सप्ताह साजरा करण्यात आला. त्याविषयी माहिती देण्यासाठी पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.




३. जयंत काकतकर यांनी लिहिलेल्या आणि 'सहकार सुगंध'ने प्रकाशित केलेल्या 'सरकारी कर्जरोखे – गुंतवणुकीचा एक उत्कृष्ट पर्याय' या पुस्तकाचे प्रकाशन पुण्यात झाले. रिझर्व्ह बँक व 'नाबार्ड'चे संचालक सतीश मराठे, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन, ज्येष्ठ गुंतवणूक सल्लागार सीए भरत फाटक, 'सकाळ मनी'चे संपादक मुकुंद लेले, लेखक जयंत काकतकर आणि 'सहकार सुगंध'चे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले.




४. जयंत काकतकर आणि भालचंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते ॲड. पटवर्धन यांचा सत्कार करण्यात आला.



५. रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था महासंघातर्फे पतसंस्था अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणवर्ग आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी महासंघाचे अध्यक्ष ॲड. जे. टी. पाटील यांच्या हस्ते राज्य फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. पटवर्धन यांचा सत्कार करण्यात आला.



६. डिपॉझिट इन्शुरन्स गॅरंटी स्कीम अर्थात ठेव विमा हमी योजनेची महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यासंदर्भातील बैठक केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या सहसचिवांच्या उपस्थितीत पुण्यात पार पडली. त्या वेळी राज्याच्या सहकार विभागाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद भालेराव, राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन, उपाध्यक्ष डॉ. शिंगी, महासचिव श्री. राजोबा आदी मान्यवर उपस्थित होते.

• जलद • सुलभ • किफायतशीर

- सोनेतारण **कर्ज**
- गृह बांधणी कर्ज
- फ्लॅट खरेदी कर्ज
- गृह खरेदी कर्ज
- व्यवसाय कर्ज
- विविध ठेव योजना
- धनसंचय ठेव योजना
- RTGS / NEFT सुविधा उपलब्ध

## हिशेबात "स्पष्टता"

३५ वर्षांची कटिबद्धता!

## संस्थेची आर्थिक स्थिती

ठेवी : 445 कोटी 91 लाख

कर्ज : 307 कोटी 17 लाख

गुंतवणूक : 196 कोटी 84 लाख

ऑडीट वर्ग : "अ"

NPA : 0%



ॲड. दीपक पटवर्धन
अध्यक्ष

कोंकणातील अग्रणी पतसंस्था

# स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था

मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी. स्टॅण्ड समोर, रत्नागिरी.

9403 506 363

www.swaroopanandpatsanstha.com